Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 14 October 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १४ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

मुंबईत प्रवेश करणाऱ्या पाचही टोल नाक्यांवर हलक्या मोटर वाहनांना संपूर्ण टोल माफी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत होत असलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. आज रात्री बारा वाजल्यापासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. या बैठकीत माजी राज्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी अटकेत असलेल्या दोघांपैकी धर्मराज कश्यप हा आरोपी अल्पवयीन नसल्याचं चाचणीतून सिद्ध झालं आहे. त्यामुळे त्याला देखील २१ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

****

राज्यात रबी हंगामातल्या पिकांचं सरासरी क्षेत्र सुमारे ५४ लाख हेक्टर असून, गेल्या वर्षीच्या रबी हंगामापेक्षा यावर्षी सुमारे अडीच लाख हेक्टरनं अधिक म्हणजे ६१ लाख हेक्टरवर रब्बीचा पेरा होईल, असा अंदाज कृषी आयुक्तालयातले उपसंचालक धनंजय कोंढाळकर यांनी व्यक्त केला आहे. राज्यात यावर्षी साडे १२ लाख क्विंटल बियाणं पुरवठ्याचं नियोजन असून, गरजेपेक्षा दोन लाख क्विंटल अतिरिक्त बियाणं उपलब्ध करुन देण्यात आलं आहे. आतापर्यंत ५४ हजार ७४० क्विंटल बियाणांचा पुरवठा करण्यात आला आहे, अशी माहिती कोंढाळकर यांनी दिली.

****

केंद्र सरकारने जम्मू काश्मीरमधली राष्ट्रपती राजवट उठवली असून, आता तिथे नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्र सरकारने यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. नॅशनल कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला यांनी जम्मू – काश्मीरमध्ये नवीन सरकार स्थापनेचा दावा केला आहे.

****

परतावा मिळवण्यासाठी ग्राहकांना त्यांच्या पसंतीचे पर्याय उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश, केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं ओला या परिवहन कंपनीला दिले आहेत. परताव्याचे पैसे थेट बँक खात्यात जमा करण्याची किंवा कुपनद्वारे परतावा मिळवण्याची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून द्यावी, असं प्राधिकरणानं तक्रार निवारण प्रक्रियेदरम्यान सांगितलं आहे. व्यवहारात पारदर्शकता यावी या उद्देशानं, बुकिंग करून ओला द्वारे प्रवास करणाऱ्यांना पावती देण्याचे निर्देशही प्राधिकरणानं दिले आहेत.

****

केंद्र सरकारच्या अंमली पदार्थ आणि नशा मुक्त भारत अभियानाअंतर्गत दिल्ली पोलिसांचा विशेष कक्ष आणि गुजरात पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत, गुजरातमधून ५१८ किलो कोकेन जप्त केलं आहे. अंकलेश्वर इथल्या एका औषध कंपनीतून जप्त केलेल्या या कोकेनची अंदाजे किंमत सुमारे पाच हजार कोटी रुपये आहे.

****

बुलढाणा इथल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात अमृत औषधालयाचं लोकार्पण केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झालं. राज्यातलं हे सातवं अमृत औषधालय आहे. गरीब आणि गरजू लोकांना सवलतीच्या दरात उत्तम दर्जाची आणि नामांकित कंपनीची औषधं याठिकाणी उपलब्ध होणार आहेत.

****

आरक्षण हे केवळ शिष्यवृत्ती, फ्रीशीप, शासकीय नोकरी मिळवण्याचं एक माध्यम नसून, राज्यघटनेचा गाभा असल्याचं मत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केलं आहे. अकोला इथं काल धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या दुसऱ्या दिवशी भरणाऱ्या धम्म मेळाव्यामध्ये ते बोलत होते. आरक्षणामुळे या देशात बंधुभाव, समतेची भावना आणि सन्मानाने जगण्याची संधी निर्माण झाली असल्याचं, त्यांनी नमूद केलं. वंचित बहुजन आघाडी सत्तेवर आल्यास हमीभाव कायदा आणेल ज्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळेल असंही आंबेडकर यांनी यावेळी सांगितलं.

****

राज्यात राष्ट्रीय पोषण अभियानांतर्गत नांदेड जिल्हयाने चार हजार १६४ अंगणवाड्यांमधून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून, तब्बल ७४ लाख ४५ हजार ३४५ नोंदी घेत राज्यात दुसरा क्रमांक मिळवला आहे. पोषण माह अभियानात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या जिल्ह्यांचा काल मुंबईत गौरव करण्यात आला. यावेळी कंधारचे बाल विकास प्रकल्प अधिकारी एल. एम. राजुरे यांनी हा पुरस्कार स्विकारला.

****

राज्य शासनाने संत सेवालाल महाराज बंजारा लमाण तांडा समृद्धी योजना सुरू केली असून, या योजनेचा पहिला हप्ता वाशीम जिल्ह्यासाठी ५ कोटी ६० लाख रुपये प्राप्त झाला आहे. जिल्ह्यातल्या एकूण ५५ गावांतल्या तांड्यांवा हा निधी वितरीत होणार आहे.

****

राज्यात अनेक भागात परतीचा पाऊस सुरु असून, काही धरणांमधून पुन्हा पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे.

हिंगोली जिल्ह्यात सिद्धेश्वर जलाशयाच्या पाणीपातळीत वाढ होत असल्यानं, धरणाचे चार दरवाजे उघडून पाच हजार ५० घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने नदीकाठच्या गावांना सावधानतेचा इशारा दिला आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथल्या जायकवाडी धरणाच्या चार दरवाजातून दोन हजार ९६ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग सुरु आहे. धरण पूर्ण भरलं असून, सध्या तीन हजार ७२ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याची आवक होत आहे.

धुळे जिल्ह्यात परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे पुन्हा एकदा नद्या नाले दुथडी भरून वाहत आहेत.

****